# कृषी सल्ला : राहुरी विभाग

## सामान्य सल्ला

- हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदूत मोबाइल ॲपचा वापर करावा.
- विजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाइल ॲपचा वापर करावा.
- गरजेनुसार पिकांमध्ये कोळपणी करून पीक तणमुक्त ठेवावे.

## ऊस

- ऊस पिकामध्ये उपलब्ध पाण्याचा प्रभावी वापर होण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. ठिबक सिंचनाद्वारे दिवसाआड पाणी द्यावे. जर ऊस प्रवाही पद्धतीवर असेल (पाण्याच्या उपलब्धतेनुसार) तर एकआड सरी प्रमाणे पाणी द्यावे.

## कापूस

- पेरणीनंतर कापसाची सर्वसाधारणपणे १० दिवसांत उगवण होते. ज्या ठिकाणी अद्याप उगवण झाली नसेल त्या ठिकाणी राखून ठेवलेल्या बियाण्यापासूनच, त्याच वाणाचे बियाणे नांग्या भरण्यासाठी वापरावे व लगेच पाणी द्यावे. त्यानंतर १५ दिवसांनी प्रत्येक फुलीवर दोनच जोमदार रोपे ठेवून बाकीची रोपे उपटून टाकावीत.

## मूग, उडीद

मूग, उडीद पिकात २० ते २५ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. तणांचे नियंत्रण करण्यासाठी निंदणी करावी.

## मका

उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसांनी पहिली कोळपणी करून घ्यावी. गरजेनुसार नांगे भरणी करून घ्यावी. आवश्यकतेनुसार तण नियंत्रणासाठी खुरपणी करणे.

## भुईमूग

- उगवण झाल्यानंतर १० ते १२ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. आवश्यकतेनुसार बी टोकून नांग्या भराव्यात.
- जमिनीत ओलावा टिकविण्यासाठी, हवा खेळती राहण्यासाठी तसेच गवताचे व तणांचे नियंत्रण करण्यासाठी हात कोळप्याने कोळपणी करून घ्यावी.

## तूर

- तुरीमध्ये शक्य असल्यास ज्वारी किंवा मका यांचे मिश्रपीक घ्यावे. हे मिश्रपीक सजीव पक्षिथांबे म्हणून उपयोगी येतात. त्यामुळे किडीच्या नैसर्गिक शत्रू कीटकांची जोपासना होण्यास मदत होते. शेतात पक्ष्यांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी 'टी' आकाराचे पक्षिथांबे हेक्टरी ५० ते ६० प्रमाणे उभारावेत.

## पशुसंवर्धन

- पावसाळ्यात जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. पशुपालकांनी आपल्या भागात कोणत्या प्रकारचे जंत आहेत, याची माहिती करून घ्यावी. जंतांचे प्रकार जाणून घेण्यासाठी जनावरांच्या शेणाची तपासणी करावी. जंतांचे प्रकार समजल्यावर पशुवैद्यकाच्या मदतीने नियंत्रणासाठी व प्रतिबंधात्मक उपायांसाठी योग्य उपाययोजना कराव्यात.
- जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी पोषक घटकांचा आहारात समावेश करून संतुलित आहार द्यावा.
- जनावरांचा गोठा कायम स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवावे. गोठ्याचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करावे.

☎ ०२४२६-२४३२३९
(ग्रामीण कृषी मौसम सेवा व कृषी विद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)